# गर्भपात- डॉक्टर आणि लाभार्थीसाठी

## लाभार्थींच्या मनातले प्रश्न

१) गर्भपात- अबॉर्शन-किती महिन्यापर्यंत करता येतो ?

- दिवस राहण्यापुर्वीच्या शेवटच्या मासिक पाळीपासून पहिल्या दिवसापासून, पुढे वीस आठवडयांपर्यंत, म्हणजेच पाचव्या महिन्यांपर्यंत गर्भपात करता येतो

२) कोणत्या वैद्यकीय / सामाजिक कारणास्तव गर्भपातास परवानगी आहे.

- खालील कारणांमुळे गर्भपात करण्यास परवानगी आहे.
  - ➢ जर गर्भवती मातेच्या जीवाला धोका असल्यास किंवा गर्भवती मातेला मानसीक किंवा शारिरिक आरोग्यास गंभीर इजा, दुखापत होत असल्यास गर्भपात करता येतो
  - ➢ जर नवजात बालकास जन्मानंतर मानसिक किंवा शारिरिक व्यंग असल्यास त्यामुळे बालकास अपंगत्व येणार असेल तर गर्भपात करता येतो
  - ➢ जर महीलेला/कुमारीकेला बलात्कारामुळे गर्भधारणा झालेली असेल, तर गर्भपात करता येतो
  - ➢ विवाहीत महीलेकडून किंवा तिच्या पतीकडून गर्भनिरोधक साहीत्याच्या/औषधाच्या निष्क्रियतेमुळे गर्भधरणा झाल्यास गर्भपात करता येतो

३) शेवटच्या आलेल्या मसिक पाळीच्या पहिल्या दिवसापासून, गर्भकाल कसा मोजायचं म्हणजेच, गर्भकाल महिन्यांत कसा ठरवायचा ?

- शेवटच्या पाळीच्या पहिल्या दिवसापासून, गर्भारपणाच्या चालू दिवसापर्यंत / आजच्या दिवसापर्यंत, आकडे मोजावेत व आलेल्या दिवसांचे आठवडयात अथवा महिन्यात रुपांतर करावे.

४) कोणत्या वयात गर्भपात करता येतो आणि कोणत्या वयात गर्भपात करता येत नाही ?

- साधारणतः १५ ते ५० हे स्त्रीचे जननक्षम वय आहे. या वयात कोणत्याही वयात तिला वर्षात गर्भधारणा होवू शकते व यापैकी कोणत्याही वयात गर्भपात करता येवू शकतो. परंतु वय व गर्भारपणाचा कालावधी जितका जास्त, तितकी गुंतागुंत होण्याची शक्यता वाढते.

## संमती पत्रक

५) गर्भपातासाठी, कोणाकोणाची संमती घ्यावी लागते-विशेषतः मुलींच्याबाबतीत

- गर्भपातासाठी गर्भवती महीलेचीच समंती घ्यावी लागते, परंतु जर गर्भवती महीला मानसिक रुग्ण असेल, किंवा ती वयाने १८ वर्षापेक्षा लहान असेल तर, तिच्या पालकांची किंवा जी कोणी व्यक्ती १८ वर्षापेक्षा जास्त वयाची व तिची काळजी घेण्यास तयार असेल तर, त्यांची संमती घेऊ शकतो.

६) गर्भपाताचं कारण कोणी ठरवायचं- डॉक्टरनी, पेशंटनी का नातेवाईकांनी ?

- कायद्याच्या चौकटीत राहून व स्त्रीच्या शाररिक व मानसिक घटकांचा विचार करुन डॉक्टर गर्भपाताचे कारण ठरवितात परंतु गर्भपात करुन घ्यायचा किंवा नाही हा निर्णय सर्वस्वी त्या स्त्रीचा असतो.

७) मला आता दिवस नको आहेत - या कारणसाठी गर्भपात करता येतो का ?

- होय, गर्भपात करता येतो

८) गर्भपात कोणत्या पेशंटला करता येत नाही ?

- गर्भ लिंगनिदान करुन गर्भपात होत असेल तर तो कायदयाने गुन्हा आहे. २० आठवडयांपेक्षा जास्त गर्भधारणा कालावधी असेल तर त्या पेशंटला गर्भपात करता येत नाही.

९) बेकायदेशीर गर्भपात म्हणजे काय?

- वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत, शासकीय मान्याप्राप्त नसलेल्या गर्भपात केंद्रात, गर्भपात करणे, तसेच मान्याता प्राप्त नसलेल्या डॉक्टरांकडून - वैद्यकिय व्यवसायिकाकडून गर्भपात करणे, तसेच वीस आठवडयांपेक्षा जास्त आठवडयांचा गर्भपात करणे, तसेच वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत ठरविलेल्या पध्दती व्यतिरिक्त इतर पध्दतींचा वापर करुन गर्भपात करणे, यास बेकायदेशीर गर्भपात असे म्हणतात.

१०)गर्भपात कोठे करावा ? सरकारी हॉस्पिटल, खाजगी हॉस्पिटल, दवाखना ?

- वैद्यकिय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत मान्याप्राप्त असलेल्या कोणत्याही गर्भपात केंद्रात गर्भपात करावा

११) पाळी नुकतीच चुकली असेल, आणि गर्भरपणाची शक्यता असेल, तर गर्भपात करण्याच्या गोळया किती दिवसांपर्यंत घेता येतात? त्या गोळया केमिस्टकडून किंवा कोणा मित्राकडून घेतल्या तर चालतील का ? का डॉक्टरकडूनच चिठ्ठी घेणे आवश्यक आहे?

- केमिस्टकडून किंवा इतरांकडून या गोळया मिळवून स्वतःच्या मनाने गोळया घेणे-सेल्फ मेडिकेशन- टाळावे. तज्ञ मान्यताप्रात्प कॉक्टरांचा सल्ला व चिठ्ठी घेणे आवश्यक आहे.

## डॉक्टरांच्या मनातले प्रश्न -

१) गर्भपातासाठी तसेच सोनोग्राफी करण्यासाठी डॉक्टरांची पात्रता -

- इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट १९५६ या कायद्यात सांगितल्याप्रमाणे, ज्यांच्याकडे आधुनिक वैद्यक-ॲलोपॅथीची-वैद्यकीय पदवी एमबीबीएस,एमएस,एमडी,डिप्लोमा इ. असून, ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे किंवा ज्यांना स्त्रीरोग याविषयात काम करण्याचा सहा महिन्यांचा अनुभव आहे किंवा सीएसी (कॉम्प्रिहेन्सीव्ह अर्बोशन केअर) प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे असे प्रशिक्षित डॉक्टर गर्भपात

करण्यासाठी पात्र समजले जातात. परंतु त्याच बरोबर हॉस्पिटलला गर्भपात केंद्र म्हणून मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) ॲलोपॅथीखेरीज इतर पॅथींच्या-आयुर्वेदीक, होमिओपॅथी, युनानी, आर.एम.पी या डॉक्टरांना गर्भपात करण्याची परवानगी आहे का ?

- नाही. यापैकी कोणत्याही डॉक्टरांना वैद्यकिय गर्भपात करण्याची परवानगी नाही. त्यांनी तसे केल्यास कायद्याचा भंग होतो. किंवा ता बेकायदेशीर गर्भपात होतो.

## हॉस्पिटलची मान्यता

३) गर्भपात सेंटर- एमटीपी सेंटरसाठी-अथवा सोनोग्राफी सेंटरसाठी, डॉक्टरांना कोणकोणत्या परवानगी - मान्यता- घ्यावी लागते?

- जिल्हा शल्य चिकित्सक /वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालीका हे एमटीपी सेंटरसाठी जिल्हा स्तरिय समिती/मनपा स्तरिय समिती बैठकीत चर्चा करुन मान्यता देतात.

४) कोणती सर्टिफिकेट घेणे आवश्यक आहे ?

- सोनोग्राफी सेंटर साठी जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेकडून नोंदणी प्रमाणपत्र (फॉर्म बी ) घेणे आवश्यक आहे.
- एमटीपी सेंटरसाठी मान्यता प्रमाणपत्र (फॉर्म बी ) घेणे आवश्यक आहे.

५) त्या परवानग्यांचे नूतनीकरण केव्हां करायचे असते ? कृपया सविस्तर माहीती द्या.

- एमटीपी सेंटरसाठी कायदयामध्ये नूतनीकरणाचा कोणताही नियम नाही.

६) एमटीपी सेंटरच्या मान्यतेसाठी १२ आठवडयापर्यंत आणि त्यानंतर १२-२० आठवडयापर्यंत वेगवेगळी मान्याता घ्यावी लागते का ?

- एमटीपी सेंटरच्या मान्यतेसाठी बारा आठवडयापर्यंत आणि त्यानंतर १२-२० आठवडयापर्यंत वेगवेगळी मान्याता घ्यावी लागते.

७) एमटीपी सेंटरसाठी अथवा सोनोग्राफी सेंटरसाठी हॉस्पिटलमध्ये कोणत्या विशेष सुविधा - आणि सोयी - इन्स्ट्रुमेंटस् आणि इक्विपमेंटस् - असण आवश्यक आहे.

(कृपया इन्स्ट्रुमेंटस् आणि इक्विपमेंटस यांची सविस्तर यादी द्यावी.)

एमटीपी सेंटर साठी (बारा आठवडयापर्यंत )

- एक्झामिनेशन टेबल
- निर्जंतुकीकरणाची साधने
- आय.व्ही.फ्ल्यूड.
- गर्भपाताशी संबंधित असणारी गोळया औषधे.
- महिला शॉक मध्ये गेल्यास त्यावरील चिकित्सा.
- पर्यायी वाहतूक व्यवस्था

एमटीपी सेंटर साठी (वीस आठवडयापर्यंत )

- ऑपरेशन टेबल
- शस्त्रक्रियागार (ओटी), शस्त्रक्रियेची साधने.
- भूल देण्याची साधने व व्यवस्था.
- निर्जंतुकीकरणाची साधने.
- आय.व्ही.फ्ल्यूड.
- गर्भपाताशी संबंधित असणारी गोळया औषधे.

## मेडिकल रेकॉर्डस

८) एमटीपी सेंटरला अथवा सोनोग्राफी सेंटरला कोणकोणती रेकॉर्डस् ठेवणं आवश्यक आहे? त्या रेकॉर्डस्साठी काही विशिष्ट फॉर्मस् असतात का ? आणि त्याची कॉपी किती दिवस जपून ठेवायची असते.

- एमटीपी – प्रत्येक गर्भपात केलेल्या महिलेचा व्यवस्थित नोंदी असलेला केसपेपर व त्यासोबत महिलेचे/ पालकांचे संमतीपत्रक व फॉर्म **I** (**RMP Opinion form**) एकत्रितपणे लावलेला असणे आवश्यक आहे. प्रत्येक केसची नोंद फॉर्म **II** (**MTP Statistical Register**) फॉर्म **III** (**Log Book**) मध्ये करणे गरजेचे असून सरकारी नियमाप्रमाणे कागदपत्राचे तसेच रजिस्ट्रेशन संबंधित दस्तऐवज यांचे जतन करावे.

- सोनोग्राफी – आंतररुग्ण रजिस्टर व बाहय रुग्ण रजिस्टर, एफ फॉर्मस, रजिस्ट्रेशन संबंधित दस्तऐवज, रुग्णांबाबत माहिती देणारे इतर दस्तऐवज, झालेल्या सोनोग्राफी संबंधी माहिती देणारे दस्तऐवज हे किमान २ वर्षे जतन करावेत.

९) हे रेकॉर्डस् कोणाला आणि किती दिवसांनी सबमिट करायचे असतात ?

- एमटीपी मान्याता प्राप्त  प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करणा-या डॉक्टरांनी सर्व रेकॉर्ड विहीत नमुन्यात (प्रश्न क्र.९ मध्ये सांगितल्याप्रमाणे) जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना सबमिट करणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त इतर सर्व सरकारी, खाजगी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात येणा-या डॉक्टरांनी हे रेकॉर्ड जिल्हा शल्यचिकित्सक यांना सबमिट करणे गरजेचे असते.

१०) गर्भपात करण्यासाठी देण्यात येणाऱ्या गोळया- मेडिकल टर्मिनेशनसाठी घ्यावयाच्या गोळया- मेझोप्रोस्टॉल कोणत्या क्वालिफिकेशन डॉक्टरांना वापरता येतात? या गोळयांचा डॉक्टरांना स्टॉक करता येतो का ? आणि किती गोळयांचा स्टॉक ठेवता येतो.

- या गोळयांचा साठा मान्यताप्राप्त एमटीपी केंद्रात केला जावू शकतो परंतु गोळया संबंधी नोंदी ठेवणे आवश्यक आहे. उदाः- बॅच नंबर, कंपनी, गोळया कोणाला-किती- केव्हा दिल्या. या गोळयांचा साठा करण्यासाठी वेगळया लायसन्सची जरुरी नसते परंतु साठा करणारी व्यक्ती एमटीपी प्रशिक्षित असून गोळयांचा साठा मान्यताप्राप्त एमटीपी केंद्रातच करता येतो.

या गोळया पेशंटला प्रिस्किप्शन लिहुन दयायला लागतात का ?

- ही सेवा सरकारी दवाखन्यात मोफत व खाजगी दवाखन्यात सशुल्क उपलब्ध होऊ शकते.

११) एमटीपी करताना काही कॉम्प्लिकेशन्स झाली, उदा. परफोरेशन, एक्सेसीव्ह ब्लिडींग, इन्फेक्शन, ॲनेस्थेशिया कॉम्प्लिकेशन इ. तर पोलीसंना कळवावा लागतं का ? दुर्दैवाने पेशंटचा मृत्यु झाल्यास डॉक्टरांनी काय करणे आवश्यक आहे – काय खबरदारी घ्यायची ?

- एमटीपी करताना कोणतेही कॉम्पीकेशन झाले असता सरकारी दवाखान्यामध्ये वरीष्ठांना कळविणे आवश्यक असून तसेच सरकारी  व खाजगी कोणत्याही दवाखान्यात कोणतीही गुंतागुंत निर्माण झाल्यास महिलेस त्वरीत वरीष्ठ केंद्रात रेफर करावे. तसेच कोणत्या कारणावरुन कॉम्पीकेशन झाले आहे यावरुन पोलिसांच्या सहभागाचा निर्णय घेतला जावू शकतो.

१२) गर्भपात करत असताना कुटूंब नियोजनाचं - स्टरलायझेशन - ऑपरेशन करता येतं का ? किती आठवडयांपर्यंत ?

- गर्भपात प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जवळपास सर्व कुटुंबनियोजनाच्या  साधनांचा वापर करता येवू शकतो पण कोणत्याही साधनांचा वापर करताना त्या स्त्रीचा वैद्यकीय दृष्टीकोनातून तिच्या शारिरिक स्थितीचा विचार केलेला असणे गरजेचे आहे.

१३) गर्भपात झालेल्या, किंवा केलेल्या, अबॉर्टसचं, डेथ सर्टिफिकेट केव्हा द्यायचं असतं?

- बारा आठवडयांनंतर गर्भपात झालेल्या किंवा केलेल्या  अबॉर्टसचं, डेथ सर्टिफिकेट गर्भपात प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिले जाते.

१४) सोनोग्राफीचा एक फॉर्म केव्हा भरायचा ? २० आठवडयानंतरही गर्भधारणा प्रत्येकवेळी केलेल्या सोनोग्राफीच्या वेळी एफ फार्म भरावा लागतो का ?

- प्रत्येक गर्भवती महिलेची तपासणी करण्यापूर्वी संबंधित माहिती एफ फॉर्ममध्ये भरणे अनिवार्य आहे.

१५) एफ फॉर्ग किती दिवस जतन करायचे?

- किमान दोन  वर्षे

१६) मध्यरात्री एखादी ब्लिडींगची किंवा इमरजन्सी पेशंट ॲडमिट झाली, तर घाईघाईने पेशंटची सोनोग्राफी करुन  ऑपरेशन थिएटरला घ्यावं लागलं, तर अशावेळी एफ फॉर्म, पेशंट नॉर्मलला आल्यावर भरला तर चालतं का ?

- एफ फॉर्म मधील माहिती ही स्वतः रुग्णानी देणे अनिवार्य नाही.संबंधित रुग्ण नातेवाईक मार्फत एफ फॉर्ममधील माहिती भरावी तसेच रुग्णाबाबतची माहिती त्वरीत तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी भरावयाची आहे.

१७) पेशंटची ट्रिटमेंट महत्वाची धरायची का एफ फॉर्म भरणं ?

- रुग्णांची तपासणी व एफ फॉर्म या दोन वेगळया बाबी असून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व आहे आणि पेशंटच्या ट्रिटमेंटसोबत एफ फॉर्म भरणे देखील तितकेच महत्वाचे आहे.

१८) गर्भपात करुन घेणेपूर्वी सोनोग्राफी तपासणी आवश्यक आहे का ?

- आवश्यक नाही. तथापी परिपूर्ण निदानासाठी सोनोग्राफी करणे महत्वाचे ठरते.

१९) सोनोग्राफी अहवालाशिवाय एमटीपी करता येते का?

- एमटीपी साठी सोनोग्राफी अहवालाची आवश्यकता नाही.

२०) एमटीपी व सोनोग्राफी दोन्हीही सेवा एकच डॉक्टर किंवा दवाखन्यामध्ये घेता येते का?

- होय, जर ते/त्या डॉक्टर दोन्ही कायदयानूसार नोंदणीकृत असतील तर.